# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date – 10 December 2025

## Time 18.10 to 18.20

## Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक – १० डिसेंबर २०२५ सायंकाळी ६.१०**

****

* मानवाधिकारांच्या जतन आणि संवर्धनासाठी भारत वचनबद्ध असल्याचं राष्ट्रपतींचं प्रतिपादन
* लोकसभेत निवडणूक सुधारणेवरची चर्चा पूर्ण–केंद्रीय गृहमंत्र्यांकडून चर्चेला उत्तर
* राज्यात इलेक्ट्रिक वाहनांना पथकर माफी आठ दिवसात लागू करावी– विधानसभाध्यक्षांचे निर्देश
* कामगार सुरक्षा उपाययोजना न पाळणाऱ्या उद्योगांवर खटले दाखल करण्याचा सरकारचा इशारा

आणि

* दीपावली सणाचा युनेस्कोच्या अमूर्त वारसा यादीत समावेश

****

मानवाधिकारांच्या जतन आणि संवर्धनासाठी भारत वचनबद्ध असल्याचं प्रतिपादन राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी केलं आहे. आंतरराष्ट्रीय मानवाधिकार दिनानिमित्त आज नवी दिल्लीत झालेल्या राष्ट्रीय परिषदेत त्या बोलत होत्या. समाजातल्या शेवटच्या व्यक्तीच्या अधिकारांचंही रक्षण व्हायला हवं, असं सांगत, राष्ट्रपतींनी मानवाधिकार दिवस हा फक्त एका दिवसापुरताच नव्हे तर प्रत्येकाच्या मनात दररोज साजरा झाला पाहिजे, असं नमूद केलं. त्या म्हणाल्या –

**बाईट – राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू**

****

अमृत भारत रेल्वे स्थानक योजने अंतर्गत देशभरात आतापर्यंत १६० रेल्वे स्थानकांचा पुनर्विकास करण्यात आला आहे. रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी आज लोकसभेत प्रश्नोत्तराच्या तासात ही माहिती दिली. या योजने अंतर्गत एक हजार ३०० स्थानकांचा विकास केला जाईल, तसंच प्रवाशांसाठी सोयी सुविधा तयार केल्या जातील, असं वैष्णव यांनी सांगितलं.

****

निवडणूक आयोगावर आरोप करणं म्हणजे भारतीय लोकशाहीची प्रतिमा जगभरात मलीन करण्याचा प्रकार असल्याचं, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी म्हटलं आहे. लोकसभेत आज निवडणूक सुधारणांवरच्या चर्चेला ते उत्तर देत होते. विरोधकांचे हे आरोप निराधार असून, निवडणूक प्रक्रियेबाबत मतदारांमध्ये कोणताही संभ्रम नसल्याचं शहा यांनी नमूद केलं. ते म्हणाले –

**बाईट – केंद्रीय गृहमंत्री अमित शहा**

दरम्यान, लोकसभेत काल सुरू झालेल्या या चर्चेला, आज नियमित कामकाजानंतर पुन्हा प्रारंभ झाला. काँग्रेसचे के सी वेणुगोपाल, वर्षा गायकवाड, भाजपचे रविशंकर प्रसाद, कंगना रनौत, राष्ट्रवादी काँग्रेसचे सुनील तटकरे, शिरोमणी अकाली दलच्या हरसिमरतकौर बादल, आझाद समाज पक्षाचे चंद्रशेखर, यांच्यासह अनेक सदस्यांनी या मुद्यावर मत मांडत, आपल्या सूचना सदनासमोर मांडल्या.

****

राज्यसभेत वंदे मातरम गीताच्या शतकोत्तर सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त काल सुरू झालेली चर्चा आज पुढे सुरू झाली. सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले, काँग्रेसचे जयराम रमेश, आम आदमी पक्षाच्या स्वाती मालिवाल, भाजपचे डॉ भागवत कराड, यांच्यासह विविध पक्षांच्या सदस्यांनी या चर्चेत सहभाग घेतला. डॉ कराड यांनी पद्मविभुषण गोविंदभाई श्रॉफ यांनी वंदे मातरम् आंदोलनात घेतलेल्या सहभागाच्या आठवणीला उजाळा दिला.

**बाईट – खासदार डॉ.भागवत कराड**

****

महाराष्ट्रात सर्व इलेक्ट्रिक वाहनांना शासनाने जाहीर केलेली पथकर माफी येत्या आठ दिवसात लागू करण्यात यावी आणि निर्णय लागू केल्यापासून वसूल झालेली पथकराची रक्कम परत करावी, असे निर्देश विधानसभेचे अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी दिले आहेत. ते आज विधानसभेत प्रश्नोत्तराच्या तासात यासंदर्भातल्या एका प्रश्नावरच्या चर्चेनंतर बोलत होते. अशा वाहनांसाठी राज्यभर चार्जिंग स्टेशन वाढवण्याची आणि त्या स्टेशन्सच्या क्षमतेत वाढ करण्याची सूचनाही अध्यक्षांनी यावेळी दिली.

****

राज्यातील औद्योगिक क्षेत्रात काम करणाऱ्या कामगारांच्या संदर्भात सुरक्षा उपाययोजना न पाळणाऱ्या उद्योगांवर खटले दाखल करण्याचा इशारा कामगार मंत्री विधीज्ञ आकाश फुंडकर यांनी दिला आहे. विधानसभेत एका लक्षवेधीच्या उत्तरात ते बोलत होते. कामगारांना आवश्यक सुरक्षा साधनं न देणाऱ्या कंपन्यांवर कडक कारवाई केली जाईल तसंच विनापरवाना सुरू असलेल्या युनिट्ससंदर्भात ‘स्पेशल ड्राईव्ह’ घेण्यात येईल, अशी माहितीही फुंडकर यांनी दिली.

****

राज्य निवडणूक आयुक्तांना पदावरून दूर करण्याची मागणी, काँग्रेस नेते नाना पटोले यांनी आज विधानसभेत केली. नगरपंचायती आणि नगरपरिषदेच्या निवडणुकांमध्ये काही प्रभागातील तसंच काही नगराध्यक्ष पदासाठीच्या निवडणुका पुढे ढकलण्याची कृती बेकायदेशीर असल्याचा आरोप पटोले यांनी केला. मात्र, सभागृहाला अशा प्रकारची कारवाई करता येत नसल्याचं, अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी सांगितलं.

****

विधान परिषदेतील प्रश्नोत्तराच्या तासात एसटी परिवहन कर्मचाऱ्यांच्या थकीत देयकांवर आणि भरती प्रक्रियेवर चर्चा झाली. एसटी महामंडळात अडीच हजार नवीन कर्मचारी भरतीची प्रक्रिया, राज्य शासनाची मंजुरी मिळताच पूर्ण करण्यात येईल, असं परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी सांगितलं.

****

दरम्यान, एसटी महामंडळाच्या ‘पॅकेज टूर’ उपक्रमाने अवघ्या सहा महिन्यांत यशाचा नवा इतिहास घडवला आहे. राज्यभरात चार हजाराहून अधिक पॅकेज टूर यशस्वीरीत्या पूर्ण करण्यात आले आहेत. या काळात एसटीने सुमारे २७ लाख किलोमीटरचा प्रवास करत १९ कोटी २४ लाख रुपये उत्पन्न मिळवलं आहे.

****

गडचिरोली इथं आज ११ जहाल नक्षलवाद्यांनी पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला यांच्यासमोर आत्मसमर्पण केलं. या सर्व नक्षलवाद्यांवर एकूण ८२ लाख रुपयांचं बक्षीस होतं. शुक्ला यांनी जहाल नक्षलवादी भूपती याच्या शरणागतीत महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या सी–६० कमांडोंचा यावेळी सत्कार केला. उर्वरित नक्षवाद्यांनाही शस्त्रं टाकून आत्मसमर्पण करण्याचं आवाहन शुक्ला यांनी केलं. गडचिरोली पोलिस आणि सीआरपीएफच्या एकत्रित प्रयत्नांमुळे २०१५ पासून आतापर्यंत ११२ नक्षलवाद्यांनी आत्मसमर्पण केलं आहे.

****

दीपावलीचा सण आता मानवतेचा अमूर्त वारसा ठरला आहे. युनेस्कोच्या अमूर्त वारसा यादीत दिवाळीचा समावेश करण्यात आल्याची माहिती केंद्रीय सांस्कृतिक कार्य मंत्री गजेंद्र सिंग शेखावत यांनी समाजमाध्यमांवरून दिली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी याबद्दल समाजमाध्यमांवर आनंद व्यक्त केला आहे. दीपावली हा फक्त सण नाही तर आपल्या संस्कृती, परंपरा आणि जीवनमूल्यांशी जोडलेली दृढ भावना असल्याचं पंतप्रधानांनी म्हटलं आहे. यापूर्वी रामलीला, दुर्गापूजा आणि इतर अनेक भारतीय परंपरा तसंच पारंपरिक कौशल्यांचा युनेस्कोच्या अमूर्त वारसा यादीत समावेश झालेला आहे.

****

दक्षिण गोव्याच्या जिल्हा दंडाधिकाऱ्यांनी पर्यटन स्थळांवर आतिशबाजी तसंच ज्वालाग्रही पदार्थांवर बंदी घातली आहे. सर्व नाईट क्लब, बार आणि रेस्टॉरंट्स, हॉटेल्स, गेस्टहाऊस, तसंच मनोरंजन स्थळांना हा निर्णय लागू आहे. गोव्यात आरपोरा इथं नुकत्याच झालेल्या नाईटक्लब दुर्घटनेत २५ जणांचा मृत्यू झाला होता. त्या पार्श्वभूमीवर आगामी नाताळ आणि नववर्ष स्वागतासाठी होणारी पर्यटकांची गर्दी लक्षात घेऊन हा निर्णय घेण्यात आला आहे.

****

नाशिक इथं कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर तपोवनात साधुग्रामच्या ३५० एकर जागेसाठी महापालिकेचा प्रस्ताव शेतकऱ्यांनी फेटाळला आहे. चालू रेडिरेकनर दरानुसारच संपूर्ण रोख मोबदला देण्यात यावा, अशी मागणी शेतकऱ्यांनी केली आहे.

****

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात वेरुळच्या घृष्णेश्वर मंदिरासह गिरी प्रदक्षिणा व्हावी, यासाठी मार्ग तयार करण्याच्या सूचना, प्रशासनाला करण्यात आल्या आहेत. अपर मुख्य सचिव बी. वेणुगोपाल रेड्डी यांनी या परिसराच्या विकास आराखड्याच्या कामाचा आज आढावा घेतला. ज्येष्ठ स्थानिक नागरिकांकडून गिरी प्रदक्षिणा मार्गाची माहिती घ्यावी, त्याला टॅक्रींग वे म्हणून विकसित करण्याची सूचना रेड्डी यांनी केली.

****